**<u>ठळक बातम्या</u>**

- देशातल्या सर्व नागरिकांचा विकास आणि कल्याण हेच विकसित भारताच्या निर्मितीमागचं लक्ष्य असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- आत्मनिर्भर आणि भविष्यासाठी सज्ज असणाऱ्या संरक्षण दलांच्या आधुनिकीकरणाला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचा संरक्षण मंत्र्यांचा पुनरुच्चार

- सैन्य दल आणि इतर सेवेतल्या ७८ अधिकारी आणि जवानांचा विविध शौर्य पुरस्कार गौरव, ९ किर्ती चक्र, २० शौर्य चक्र जाहीर

- यंदाच्या जनगणनेत नागरिकांना 'जात' विचारली जाणार, सरकारकडून प्रश्नांची अधिसूचना जारी

**आणि**

- उत्तराखंडमध्ये जलविद्युत प्रकल्पाच्या बोगद्यात दरड कोसळल्यामुळे ७ जणांचा मृत्यू, १२ जण जखमी

**<><><><><>**

देशातल्या सर्व नागरिकांचा विकास आणि कल्याण हेच विकसित भारताच्या निर्मितीमागचं लक्ष्य आहे. लोकसहभाग आणि सरकारच्या प्रयत्नांमुळं देशातले सर्व नागरिक सुखी आणि समृद्ध होतील अशा विश्वास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी व्यक्त केला आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला देशवासियांना त्यांनी संबोधित केलं. स्वतंत्र भारताला विकसित भारत बनवण्यासाठीच्या राष्ट्रीय साधनेत स्वतःला समर्पित करण्याचं आवाहन त्यांनी देशातल्या नागरिकांना केलं.

**- - - बाइट १ - --**

आपलं संविधान लोकांच्या भागिदारीवर आधारीत आहे. त्याचप्रमाणे देशातली विविध राष्ट्रीय अभियान जनभागीदारीच्या तत्त्वावर चालवली जात असल्याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

**- - बाइट २ - - -**

जगात अनेक ठिकाणी युद्ध आणि अस्थिरता असताना देशाच्या अर्थव्यवस्थेचा वृद्धीदर प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये सर्वाधिक असल्याचं राष्ट्रपती या भाषणात म्हणाल्या.

**- - - बाइट ३- -**

यावेळी त्यांनी देशातली विविध विकास कामं, पायाभूत सुविधा क्षेत्रातल्या प्रगतीचा, महिला, युवा, उद्योजक आणि खेळांमधल्या देशाच्या कामगिरीचा आढावा घेतला. तसंच महात्मा फुले आणि ज्योतिबा फुले यांच्या कार्याला उजाळा दिला. देशाच्या परराष्ट्र धोरणाचंही त्यांनी कौतुक केलं. संयुक्त राष्ट्रांसह विविध आंतरराष्ट्रीय संघटनांमध्ये विविध देशांचं योग्य प्रतिनिधीत्व असावं या भारताच्या भूमिकेचा त्यांनी यावेळी पुनरुच्चार केला.

पर्यावरण, नैसर्गिक साधनसंपत्तीचं जतन करण्याचं आणि भावी पिढ्यांसाठी त्या उपलब्ध करुन देण्याचं आवाहन त्यांनी यावेळी केला.

श्रोते हो, राष्ट्रपतींच्या या संदेशाचा मराठी अनुवाद रात्री साडेनऊ वाजता आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात येईल.

**<><><><><>**

आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक-इन-इंडिया' सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून,केंद्र सरकार आत्मनिर्भर आणि भविष्यासाठी सज्ज असणाऱ्या संरक्षण दलांच्या आधुनिकीकरणाला सर्वोच्च प्राधान्य देत आहे, असं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला आकाशवाणीवरून संरक्षण दलांना संबोधित करताना ते बोलत होते. भारत आता केवळ आपल्या सुरक्षेच्या गरजा पूर्ण करणारा देश नसून, जागतिक संरक्षण उत्पादन केंद्र आणि संरक्षण सामग्रीचा निर्यातदार म्हणूनही उदयास आला आहे, वर्ष २०१४ मध्ये केवळ ४६ हजार कोटी रुपये असलेले देशांतर्गत संरक्षण उत्पादन २०२५-२६ या आर्थिक वर्षात पावणे १ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

राष्ट्रपतींनी आज सेना दल तसंच इतर सेवेतल्या ७८ अधिकारी आणि जवानांना विविध शौर्य पुरस्कार जाहीर केले. त्यात ९ किर्ती चक्र, २० शौर्य चक्र, ४१ सेना पदक, ३ नौसेना पदक आणि ५ वायू सेना पदकांचा समावेश आहे. १३ जणांना हे पुरस्कार मरणोत्तर दिले जाणार असून एका व्यक्तीला दुसऱ्यांदा शौर्य चक्र आणि ५ जणांना दुसऱ्यांदा सेना पदक

जाहीर झालंय. लेफ्टनंट कर्नल मनओ फ्रान्सिस, मेजर जितेंद्र राठी आणि हवालदार गजेंद्र सिंग यांना किर्ती चक्र जाहीर झालंय.

**<><><><><>**

८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या सकाळी लाल किल्ल्यावर ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर ते देशाला उद्देशून संबोधन करतील. या विषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**- - व्हाइस कास्ट - - -**

*(देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी देशभरात जय्यत तयारी सुरू आहे. देशाचा मुख्य कार्यक्रम लाल किल्ल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होईल. यावेळी ध्वजारोहणासाठी कॅप्टन सोनिया सिंग चौहान प्रधानमंत्र्यांना सहाय्य करतील. त्यानंतर २१ तोफांची सलामी दिली जाईल. यावर्षी पहिल्यांदाच लाल किल्ल्यावर वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचं गायन होईल. त्यानंतर राष्ट्रगीत गायलं जाईल. भारतीय सैन्यदलातले जवान, माय भारतचे स्वयंसेवक यासह मुले-मुली मिळून एकूण अडीच हजार जण यावेळी उपस्थित असतील. याशिवाय प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, मुद्रा योजना, पीएम स्वनिधी योजनेचे लाभार्थी, भारत टॅक्सीचे चालक असे ५ हजार विशेष पाहुणे यासाठी विशेष निमंत्रित आहेत.*

*संध्याकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती भवनात स्वागत समारंभाचं आयोजन करणार आहेत. यासाठीच्या निमंत्रण पत्रिकेत वारली चित्रकलेचा समावेश आहे. या समारंभात लावणी नृत्य, सोंगी मुखवटे सादर केले जाणार आहेत. याशिवाय गोंधळ, जागरण, वाघ्या मुरळी परंपरेतले लोक कलाकार यात सहभागी होणार आहेत. या पाहुण्यांसाठी आयोजित मेजवानीच्या टेबलावर खण ठेवला जाणार आहे. तर खाद्य पदार्थांमध्ये वडा पाव, पातोळे यांच्या समावेश आहे.)*

**<><><><><>**

**श्रोते हो,** लालकिल्ल्यावरुन होणाऱ्या या समारंभांचे थेट प्रक्षेपण सकाळी ७ वाजेपासून आपल्याला आकाशवाणीवरुन ऐकता येईल. त्यामुळं सकाळच्या प्रादेशिक बातम्या ६ वाजून ४० मिनिटांनी प्रसारित होती.

**<><><><><>**

सध्या सुरू असलेल्या जनगणनेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी अधिसूचनेद्वारे देशाचे ‘जनगणना आयुक्त आणि महा रजिस्ट्रार’ यांनी आज राजपत्रात प्रसिद्ध केली आहेत. त्यात नागरिकांना जात नोंदवण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. २०११ मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी केवळ अनुसूचित जाती आणि जमातीच्या नागरिकांना जात नोंदवण्याचा पर्याय उपलब्ध होता.

गेल्या वेळेच्या जनगणनेत एकूण २९ प्रश्न नागरिकांना विचारले गेले होते, यावेळी ही संख्या ४० झाली आहे.जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात ही माहिती नागरिकांना विचारली जाईल. यात यंदा कोविड लस घेतल्याचे ठिकाण, एकूण बँक खात्यांची संख्या, मोबाईल, आधार, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट आणि वाहन परवाना याचीही माहिती विचारली आहे.

<><><><><>

उत्तराखंडच्या चमोली जिल्ह्यात पीपलकोटी इथं टिहरी जलविद्युत परियोजना प्रकल्पाच्या निर्माणाधिन बोगद्यात काल संध्याकाळी भूस्खलन आणि पाण्याची गळती होऊन झालेल्या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला असून ३ जण बेपत्ता आहेत. या दुर्घटनेत १२ जण जखमी झाले आहेत.

दुर्घटना घडली तेव्हा या बोगद्यात २२ कामगार होते. त्यातील १९ जणांना बाहेर काढण्यात आले मात्र त्यातील सात जणांचा मृत्यू झाला.

<><><><><>

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेच्या अंतर्गत अन्न धान्य वितरणाच्या ऐवजी ठराविक रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात हस्तांतरित करण्याच्या उपक्रमाला आजपासून चंदीगड आणि दादरा नगर हवेलीमध्ये सुरुवात झाली. CBDC अर्थात Central Bank Digital Currency च्या माध्यमातून ही रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. या रकमेचा वापर विविध किराणा दुकानातून धान्य खरेदीसाठी करता येणार आहे. देशात पहिल्यांदाच विविध योजनांचे लाभ CBDC च्या माध्यमातून द्यायची सुरुवात झाली आहे.

<><><><><>

अमली पदार्थ तस्करीतला फरार सूत्रधार वीरेंद्र सिंग बसोया याला संयुक्त अरब अमिराती मधून ताब्यात घेऊन भारतामध्ये परत आणलं आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सांगितलं आहे. २०२४ मध्ये पुण्यातून पाचशे ग्रॅम मेफेड्रोन हे एक कृत्रिम उत्तेजक

द्रव्य जप्त करण्यात आलं होतं, त्यामागे बसोया याचं नाव पुढे आलं होतं. त्यानंतर एनसीबीनं केलेल्या कारवाईमध्ये पुण्यातून तब्बल ८६७ तर दिल्लीतून ९७० किलो मेफेड्रोन जप्त करण्यात आलं होतं.

**//<><><><><>//**